**सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी**
**ऑनलाईन पद्धतीने नामतालिका तयार करणेबाबत**
**सन २०२६-२०२८**

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
५- बी. जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

---

**जा.क्र.: सआ-२०/लेखापरीक्षण/लेखापरीक्षक नामतालिका / सन २०२६-२०२८/ ५१८/२०२६,**
**दिनांक : ०१ / ०४ /२०२६**

## -: परिपत्रक :-

**वाचा : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१.**
**२. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ६९.**

**वाचले : १. महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक : सगृयो-२०१७,स-१४/प्र.क्र.५५/३८९, दिनांक २० जानेवारी २०१७.**
**२. शासन निर्णय क्रमांक: सगृयो २०२४/प्र.क्र.२०/१४-स,दिनांक : ७ फेब्रुवारी, २०२४.**
**३. कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र. : सगृयो-२०२५/प्र.क्र.१५६/१४-स, दिनांक : १७.१२.२०२५**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ अन्वये सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाची तरतूद आहे. उक्त अधिनियमान्वये सहकारी संस्थांचे लेखापरीक्षणास्तव लेखापरीक्षक नेमणुकीची स्वायतत्ता संस्थेच्या वार्षिक साधारण सभेस प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच, निबंधकांनी तयार केलेल्या व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामतालिकेवरील लेखापरीक्षकांकडून संस्थेने लेखापरीक्षण करवून घ्यावयाचे आहे. या नामतालिकेमध्ये सनदी लेखापाल, सनदी लेखापालांच्या फर्म, परिव्यय लेखापाल, परिव्यय लेखापालांच्या फर्म, प्रमाणित लेखापरीक्षक आणि शासकीय लेखापरीक्षक यांचा अंतर्भाव आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ६९ मधील तरतुदीनुसार वाचले क्र. २ येथील शासन निर्णयान्वये सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी अर्हताधारक लेखापरीक्षकांची दि. ७/२/२०२४ ते ३१/३/२०२६ या कालावधीची राज्यस्तरीय लेखापरीक्षकांची नामतालिका प्रसिद्ध केलेली आहे. सदरहू शासन निर्णय **www.maharashtra.gov.in** या शासनाच्या संकेत स्थळावर तत्कालावधीमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. तसेच उक्त नामतालिका सहकार विभागाच्या www.mahasahkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देखील अपलोड केलेली होती, सदरची नामतालिका सध्या https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या पोर्टलवर उपलब्ध आहे. या नामतालीकेची मुदत ३१/३/२०२६ रोजी संपुष्टात येणार आहे. सदर मुदत संपुष्टात येणेपूर्वी वाचले क्र. १ अन्वयेच्या शासन निर्णयाप्रमाणे पुढील २ आर्थिक वर्षासाठीची नामतालिका तयार करणे आवश्यक आहे. वाचले

क्र. ३ अन्वये दि. १/४/२०२६ ते ३१/३/२०२८ या कालावधीची अर्हताधारक लेखापरीक्षकांची नामतालिका तयार करून प्रसिद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत. वाचले क्र. १ येथील शासन निर्णयाप्रमाणे लेखापरीक्षक नामतालिका तयार करण्यासाठी एकसुत्रता राखणेस्तव मार्गदर्शक सूचना प्रसारित करणे आवश्यक झाले असल्याने, दि. १/४/२०२६ ते ३१/३/२०२८ या कालावधीची नामतालिका तयार करणेसाठी पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

नवीन लेखापरीक्षक नामतालिका तयार करण्यासाठी दिनांक **०६/४/२०२६ ते २०/४/२०२६** या कालावधीमध्ये इच्छुकांकडून https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवायाचे आहेत. लेखापरीक्षक नामतालिकेवर नोंदणीकृत होणेसाठी सद्यस्थितीत नामतालिकेवर असलेल्या लेखापरीक्षकांची नोंदणी यापुढे देखील कायम राहणेस्तव इच्छुक असलेले व नव्याने अर्हता धारण करणारे इच्छुक लेखापरीक्षक याप्रमाणे दोन्ही प्रकारांपैकी लागू प्रकारामध्ये संबंधीतांना वरील संकेत स्थळावर अर्ज करता येतील. याप्रमाणे नामतालिकेवर नोंदणीकृत होणेसाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी नियोजनबद्ध व काटेकोरपणे होणेसाठी पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत -

**१. नामतालिकेसाठी ऑनलाईन अर्ज मागणी, छाननी या संदर्भातील कृती कार्यक्रम :**

| अ. क्र. | कामकाजाचे स्वरुप | कालावधी | | दिवस |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| १. | नामतालिका तयार करणेबाबतची सूचना प्रसिद्ध करणे. (ऑनलाईन पद्धतीने वेबसाईटवर, राज्यस्तरीय वर्तमानपत्रात, कार्यालयांचे नोटीस बोर्डवर, इत्यादी ) | २/४/२०२६ | - | १ |
| २. | नवीन नामतालिकेसाठी ऑनलाईन अर्ज व पात्रतेसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करण्याचा कालावधी. | ०६/४/२०२६ | २०/४/२०२६ | **१५** |
| ३. | नवीन नामतालिकेसाठी सादर झालेले ऑनलाईन अर्ज व पात्रतेसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे यांची छाननी जिल्हा स्तरावरील समितीने करणे. | २१/४/२०२६ | ०५/५/२०२६ | **१५** |
| ४. | जिल्हा स्तरीय समितीने छाननी केलेल्या ऑनलाईन अर्जाची व पात्रतेसंदर्भातील आवश्यक त्या कागदपत्रांची तपासणी सहकार आयुक्त कार्यालय स्तरावर करणे. | ०६/५/२०२६ | २०/५/२०२६ | **१५** |
| ५. | अस्विकृत अर्जांचे विरोधात तक्रार निवारण समितीकडे दाद मागणे, तसेच अस्विकृत अर्जांपैकी ज्यांनी तक्रार निवारण समितीकडे दाद मागितलेली आहे, त्यासंदर्भातील तक्रार निवारण समिती स्तरावरील छाननी कामकाज करणे व सहकार आयुक्त कार्यालयास दैनंदिन अहवाल पाठविणे. | २१/५/२०२६ | २७/५/२०२६ | **७** |
| ६. | अस्विकृत अर्जांचे विरोधात तक्रार निवारण समितीकडे दाद मागितलेल्या अर्जांपैकी समितीने स्विकृत करणेसाठी शिफारस केलेल्या अर्जासंदर्भातील छाननी कामकाज सहकार आयुक्त कार्यालय स्तरावर करणे. | २८/५/२०२६ | ०६/६/२०२६ | **१०** |
| ७. | पात्र लेखापरीक्षकांची यादी अंतिम करणे. | १०/६/२०२६ | | |

**२.** नामतालिकेसाठी आलेल्या ऑनलाईन अर्जाची छाननी व तदनुषंगाने समन्वय करणेसाठी नियम ६९ (१) (फ) (तीन) प्रमाणे जिल्हा उपनिबंधक यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा छाननी समित्या स्थापन कराव्यात. या समित्यांमध्ये प्रतिनिधी म्हणून जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांचेसह सनदी लेखापाल, परिव्यय लेखापाल व

प्रमाणित लेखापरीक्षक यांच्या प्रतिनिधींचा समावेश, मान्यताप्राप्त संघटनेकडून / संस्थेकडून नावे प्राप्त करून करावयाचा आहे. जिल्ह्यातील सहायक निबंधक (प्रशासन) हे या समितीचे सदस्य सचिव असतील. याप्रमाणे गठीत जिल्हास्तरीय समितीची प्रत या कार्यालयास सादर करावी. सदरचे कामकाज संबंधीत जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी जिल्हा स्तरावर समन्वयाने व अचुकता राखुन करावयाचे आहे.

३. नामतालिकेसाठी आलेल्या ऑनलाईन अर्जाच्या छाननीमध्ये अस्विकृत केलेल्या व्यथित अर्जदारांना दाद मागण्यासाठी व तद्नुषंगाने समन्वय करणेसाठी नियम ६९ (१) (फ) (पाच) प्रमाणे विभागीय सहनिबंधक यांचे अध्यक्षतेखाली विभागनिहाय तक्रार निवारण समित्या स्थापन कराव्यात. या समित्यांमध्ये विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) हे सदस्य आणि विभागीय उपनिबंधक हे सदस्य सचिव म्हणून कामकाज करतील. याप्रमाणे गठीत समितीच्या आदेशाची प्रत या कार्यलयास सादर करावी. या समितीचा निर्णय अंतिम असेल.

४. **जिल्हा स्तरीय छाननी समितीने करावयाचे कामकाज :**

१. लेखापरीक्षक नामतालिकेसाठी जाहिरातीनुसार https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या सहकार विभागाच्या संकेत स्थळावर आलेल्या अर्जांची नोंद ठेवली पाहिजे. सदरच्या नोंदीप्रमाणे अर्ज स्विकारला किंवा नाकारला याबाबतच्या नोंदी कराव्यात.

२. प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जाची, पुढील **मुद्दा क्र. ७** मध्ये नमूद केलेल्या छाननी निकषानुसार छाननी करणे, तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन अर्ज अंतिम करणे.

३. प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जाची छाननी दिनांक **२१/४/२०२६** पासून **०५/५/२०२६** या कालावधीत करावयाची असून सोबतच्या कृती कार्यक्रमानुसार दिलेल्या दिनांक **०५/५/२०२६** या अंतिम दिनांकापर्यंत प्रतिदिन नियमित स्वरूपात पूर्ण करावयाची आहे.

४. ऑनलाईन अर्जाची छाननी पूर्ण झाल्यानंतर सदर अर्ज सोबतच्या कृती कार्यक्रमानुसार पुढील कार्यवाहीसाठी प्रतिदिन नियमितपणे सहकार आयुक्त कार्यालयाकडे ऑनलाईन पद्धतीने पाठवावेत.

५. जे अर्ज निकषात बसत नसतील, ते अस्विकृत करून त्याचे कारण नमूद करावे. **उदा.**

- i शैक्षणिक पात्रते संदर्भातील कागदपत्रे अपलोड नसणे अथवा ती सुस्पष्ट नसणे.
- ii स्वयंघोषीत शपथपत्र अपलोड नसणे.
- iii निर्धारीत साईज मधील फोटो अपलोड नसणे.
- iv पॅन कार्ड झेरॉक्स / स्कॅन / फोटो कॉपी अपलोड नसणे.
- v सनदी / परिव्यय लेखापालांची पार्टनरशीप फर्म / प्रोप्रायटरी फर्म तसेच वैयक्तिक सनदी / परिव्यय लेखापालांचे Constitution Certificate अपलोड नसणे.
- vi सनदी / परिव्यय लेखापालांची प्रोप्रायटरी फर्म, वैयक्तिक सनदी / परिव्यय लेखापाल आणि प्रमाणित लेखापरीक्षकांनी सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा अनुभव असल्याबाबतचे प्रमाणपत्र अथवा त्या अनुषंगिक कागदपत्रे अपलोड न करणे किंवा ती सुस्पष्ट नसणे.

६. ऑनलाईन अर्जाचे छाननीनंतर नामतालिकेवरील समावेशासाठी शिफारसीनुसार पात्र / अपात्र अर्जदारांची यादी समिती सदस्यांनी सही करून सहकार आयुक्त कार्यालयाकडे **हार्ड कॉपी व सॉफ्ट** कॉपीद्वारे सादर करावी.

७. **लेखापरीक्षक नामतालिकेसाठी प्राप्त ऑनलाईन अर्जाची छाननी करावयाचे निकष :**

१. ऑनलाईन प्रक्रियेद्वारा प्राप्त झालेला अर्ज, अर्ज भरण्याच्या सूचनांच्या अनुषंगाने परिपूर्ण असल्याची खात्री करावी. उदा. शैक्षणिक पात्रता, लेखापरीक्षण अनुभव, फोटो, शपथपत्र, पत्ता, पॅन कार्ड, ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक इत्यादी.

तसेच संबंधीत अर्जदारांनी अपलोड केलेले सर्व दस्त अर्जातील नमूद माहितीशी मिळते-जुळते आहेत किंवा कसे ? याची खात्री करणे आवश्यक आहे.

२. अर्जदाराने अर्जातील तपशील भरताना, कलम ८१ व नियम ६९ मधील तरतुदीनुसार नामतालिकेकरीता अर्हताधारक लेखापरीक्षक, त्यासाठीचा अनुभव, पात्रता निर्देशीत केलेल्या अटींचे पूर्णत: पालन करून संपूर्ण तपशील भरलेला आहे किंवा नाही, याची खात्री करावी.

३. प्राप्त अर्जापैकी नामतालिकेवरील समावेशासाठी पात्र अर्जांच्या बाबतीत लेखापरीक्षकांची 'अ', 'ब', 'क' या वर्गवारीत **अ १, अ २, ब १, ब २** आणि **क** अशी वर्गवारी करावयाची असून त्याप्रमाणे नामतालिकेवरील समावेशासाठी त्यांची शिफारस करावी.

४. **सनदी / परिव्यय लेखापाल यांच्या भागीदारी फर्म :**

i. सनदी / परिव्यय लेखापाल यांच्या भागीदारी फर्मसाठी सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा अनुभव असण्याची आवश्यकता नाही.

ii. लेखापरीक्षकांची वर्गवारी निश्चित करताना - सनदी / परिव्यय लेखापाल यांच्या भागीदारी फर्मचा समावेश लेखापरीक्षकांच्या अ वर्गापैकी **अ १** या उपवर्गात करावा.

iii. सनदी / परिव्यय लेखापाल यांच्या भागीदारी फर्मच्या बाबतीत फर्मच्या सर्व भागीदारांचा तपशील अर्जामध्ये नमूद केलेला आहे किंवा नाही, याची पडताळणी ICAI / ICWA यांनी संबंधीतांस दिलेल्या Constitution Certificate वरून करावी.

iv. फर्मच्या भागीदारांनी नामतालिकेसाठी वैयक्तीक कक्षेने किंवा इतर भागीदारी फर्मच्या माध्यमातून नामतालिकेवरील समावेशासाठी अर्ज केलेला नाही, याचे शपथपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. **(एकच व्यक्ती दोन वेगवेगळया कक्षेने अर्ज करू शकणार नाही.)**

v. फर्मच्या सर्व भागीदारांनी मेंबरशीप नंबर नमूद करणे तसेच शपथपत्रावर सर्व भागीदारांनी सह्या करणे बंधनकारक आहे.

vi. अर्जासोबत सनदी / परिव्यय लेखापाल यांच्या भागीदारी फर्मचे Constitution Certificate (स्टेटस रिपोर्ट), तसेच भागीदारांचे सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टीस (COP) च्या मुळ प्रतीची स्वसाक्षांकित पी.डी.एफ. कॉपी अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

vii. भागीदारी फर्मच्या सर्व भागीदारांचे फोटो व पॅन कार्डची अपलोड केलेली स्कॅन / फोटो कॉपी सुस्पष्ट असावी.

viii. सनदी / परिव्यय लेखापालांच्या भागीदारी फर्म / प्रोप्रायटरी फर्मचे तसेच वैयक्तीक सनदी / परिव्यय लेखापाल यांचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्रात असणे आवश्यक आहे.

ix. सनदी / परिव्यय लेखापालाच्या भागीदारी फर्म्सचे भागीदार हे पूर्ण वेळ नोकरी करीत असल्यास, ते नव्याने नामतालीकेवर अर्ज करणेस पात्र असणार नाहीत.

x. ज्या सनदी / परिव्यय लेखापाल भागीदारी फर्म्सचे भागीदार यांचे वय नामतालीकेवर अर्ज करतेवेळी ६५ वर्षापेक्षा अधिक आहे, त्यांनी लेखापरीक्षण कामकाजासाठी प्रवास करणेची व लेखापरीक्षण कामकाज करणेची शारीरिक क्षमता असलेबाबत नोंदणीकृत वैद्यकिय चिकित्सक यांनी दिलेले प्रमाणपत्र स्वयंघोषित शपथपत्रासोबत पी. डी. एफ. स्वरुपात एकत्रित अपलोड करणे आवश्यक आहे, अन्यथा नामतालीकेवर येणेसाठी अर्जदार पात्र असणार नाही.

xi. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ (१) (ग) अन्वये नामतालीकेवरून नाव काढून टाकलेले सनदी / परिव्यय लेखापाल यांच्या भागीदारी फर्म हे पुन्हा नवीन नामतालीकेवर येणेस अपात्र राहतील.

## ५. सनदी / परिव्यय लेखापाल

i. नामतालिकेसाठी सनदी / परिव्यय लेखापाल यांना फर्मद्वारे किंवा वैयक्तिकरित्या यापैकी कोणत्याही एकाच कक्षेत अर्ज करता येईल.

ii. नामतालिकेसाठी जर एखाद्या सनदी / परिव्यय लेखापालांनी फर्मद्वारे व वैयक्तिकरित्या असे स्वतंत्र अर्ज केले असल्यास, दोन्ही अर्ज अस्विकृत केले जातील.

iii. अर्जासोबत सनदी / परिव्यय लेखापाल यांनी सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टीस (COP) तसेच Constitution Certificate ( स्टेटस रिपोर्ट ) यांच्या स्वसाक्षांकित प्रती अपलोड करणे आवश्यक आहे.

iv. सनदी / परिव्यय लेखापाल यांची लेखापरीक्षक वर्गवारी निश्चित करताना - ज्या वैयक्तिक सनदी / परिव्यय लेखापाल यांना सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा **किमान ५ व त्यापेक्षा जास्त वर्षांचा अनुभव** आहे, अशा वैयक्तिक सनदी / परिव्यय लेखापाल यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या **अ** ' वर्गापैकी **अ १**' या उपवर्गात करावा.

v. वैयक्तीक सनदी / परिव्यय लेखापाल यांना सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा **किमान १ वर्षाचा परंतु ५ वर्षांपेक्षा कमी अनुभव आहे**, अशा वैयक्तीक सनदी / परिव्यय लेखापाल यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या **ब**' वर्गापैकी **ब १**' या उपवर्गात करावा.

vi. जे वैयक्तिक सनदी / परिव्यय लेखापाल हे पूर्ण वेळ नोकरी करीत असल्यास, ते नामतालीकेवर अर्ज करणेस पात्र असणार नाहीत.

vii. ज्या वैयक्तिक सनदी / परिव्यय लेखापाल यांचे वय नामतालीकेवर अर्ज करतेवेळी ६५ वर्षापेक्षा अधिक आहे, त्यांनी लेखापरीक्षण कामकाजासाठी प्रवास करणेची व लेखापरीक्षण कामकाज करणेची शारीरिक क्षमता असलेबाबत नोंदणीकृत वैद्यकिय चिकित्सक यांनी दिलेले प्रमाणपत्र स्वयंघोषित शपथपत्रासोबत पी. डी. एफ. स्वरुपात एकत्रित अपलोड करणे आवश्यक आहे, अन्यथा नामतालीकेवर येणेसाठी अर्जदार पात्र असणार नाही.

xii. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ (१) (ग) अन्वये नामतालीकेवरून नाव काढून टाकलेले सनदी / परिव्यय लेखापाल हे पुन्हा नवीन नामतालीकेवर येणेस अपात्र राहतील.

## ६. प्रमाणित लेखापरीक्षक :

i. प्रमाणित लेखापरीक्षकांसाठी कोणत्याही शाखेतील **पदवी, सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका ( जी.डी.सी. ॲण्ड ए. ) धारण करणे ही अट अनिवार्य आहे.** जे प्रमाणित लेखापरीक्षक अर्जदार **पदवी व जी.डी.सी. ॲण्ड ए. पदविका धारक नसतील, ते नामतालिकेसाठी अर्ज करण्यास पात्र असणार नाहीत.**

ii. ज्या प्रमाणित लेखापरीक्षकांना सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा किमान १० व त्यापेक्षा जास्त वर्षांचा अनुभव आहे, अशा प्रमाणित लेखापरीक्षकांचा समावेश लेखापरीक्षकांच्या **ब**' वर्गापैकी **ब २** या उपवर्गात करावा.

iii. ज्या प्रमाणित लेखापरीक्षकांना सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा किमान ३ वर्षांचा परंतु १० वर्षापेक्षा कमी वर्षांचा अनुभव आहे, अशा प्रमाणित लेखापरीक्षकांचा समावेश लेखापरीक्षकांच्या **क** वर्गात करावा.

iv. सहकार खात्यातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी प्रमाणित लेखापरीक्षक म्हणून अर्ज करीत असल्यास, ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले आहेत, त्या कार्यालयाचा, लेखापरीक्षणाच्या अनुभवाचा दाखला त्यांनी अपलोड करावा.

v. सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी प्रमाणित लेखापरीक्षकासाठी निर्धारीत करुन दिलेल्या अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.

vi. प्रमाणित लेखापरीक्षक यांनी पदवी प्रमाणपत्र व जी. डी. सी. ॲण्ड ए. प्रमाणपत्राच्या मूळ प्रतीची पी. डी. एफ. कॉपी अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

vii. प्रमाणित लेखापरीक्षक म्हणून नाम तालीकेवर येणेस ईछुक उमेदवार पूर्ण वेळ नोकरी करीत असल्यास, ते नामतालीकेवर येणेसाठी अर्ज करणेस पात्र असणार नाहीत.

viii. नामतालिकेसाठी लेखापरीक्षकास एकच अर्ज करता येईल, जर एखाद्या लेखापरीक्षकाने दोन स्वतंत्र अर्ज केले असल्यास, दोन्ही अर्ज अस्विकृत केले जातील.

ix. ज्या उमेदवाराचे वय नामतालीकेवर अर्ज करतेवेळी ६५ वर्षापेक्षा अधिक आहे, त्यांनी लेखापरीक्षण कामकाजासाठी प्रवास करणेची व लेखापरीक्षण कामकाज करणेची शारीरिक क्षमता असलेबाबत नोंदणीकृत वैद्यकिय चिकित्सक यांनी दिलेले प्रमाणपत्र स्वयंघोषित शपथपत्रासोबत पी. डी. एफ. स्वरुपात एकत्रित अपलोड करणे आवश्यक आहे, अन्यथा नामतालीकेवर येणेसाठी अर्जदार पात्र असणार नाही.

x. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ (१) (ग) अन्वये नामतालीकेवरून नाव काढून टाकलेले **प्रमाणित लेखापरीक्षक** हे पुन्हा नवीन नामतालीकेवर येणेस अपात्र राहतील.

**७. शासकीय लेखापरीक्षक :**

i. सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या अ वर्गापैकी **अ १'** या उपवर्गात करावा.

ii. विशेष लेखापरीक्षक वर्ग १ यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या अ वर्गापैकी **अ २'** या उपवर्गात करावा.

iii. विशेष लेखापरीक्षक वर्ग २ यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या ब वर्गापैकी **ब १'** या उपवर्गात करावा.

iv. लेखापरीक्षक, श्रेणी १ यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या ब वर्गापैकी **ब २'** या उपवर्गात करावा.

v. लेखापरीक्षक, श्रेणी २ आणि उपलेखापरीक्षक यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या **क'** वर्गात करावा.

vi. त्याचप्रमाणे सरळसेवा भरतीने जे शासकीय लेखापरीक्षक सेवेत दाखल झालेले असतील, त्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण केलेला असावा.

vii. परिविक्षाधिन कालावधी पुर्ण केलेल्या, **सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका (जी.डी.सी. ॲण्ड ए.) किंवा सहकार लेखाशास्त्र यामधील पदविका**

**(डी.सी.ए.) किंवा सहकार व्यवस्थापनामील उच्च पदविका (एच.डी.सी.एम.)** धारण केलेल्या सर्व शासकीय लेखापरीक्षकांची नामतालिकेवर नोंदणी होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधीत विभागीय सहनिबंधक, (लेखापरीक्षण) तसेच जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी व्यक्तिश: त्यांचे विभागातील व जिल्ह्यातील सर्व शासकीय लेखापरीक्षकांना नव्याने तयार होणाऱ्या नामतालिकेवर नोंदणीकृत करून घ्यावे.

viii. सहकार विभागाच्या लेखापरीक्षण शाखेतील परिविक्षाधिन कालावधी पूर्ण केलेले व अधिनियमान्वये निर्धारित असलेली अर्हता धारण केलेले कार्यरत सर्व शासकीय लेखापरीक्षक यांची मूळ नियुक्ती सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी आहे. सदरहू कर्तव्य परायणता राखणेसाठी **सर्व शासकीय लेखापरीक्षकांनी नामतालिकेवर नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.**

## ८. स्वयंघोषीत शपथपत्र :

i. स्वयंघोषीत शपथपत्र हे सोबतच्या **परिशिष्ट २** प्रमाणे विहित नमुन्यात, साध्या कागदावर तयार करून मुळ प्रत स्कॅन करून अपलोड केलेले असावे.

ii. सर्व लेखापरीक्षकांना सहकारी संस्थांचे उचित ज्ञान व मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक असलेने, त्यांनी याबाबत स्वयंघोषीत शपथपत्रामध्ये महाराष्ट्रात किमान ३ वर्ष वास्तव्य असून मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असल्याचे घोषीत करणे आवश्यक आहे.

iii. भागीदारी फर्मच्या किमान २ भागीदारांचे महाराष्ट्रात किमान ३ वर्ष वास्तव्य आहे व त्यांना मराठी भाषेचे ज्ञान आहे, असे स्वयंघोषीत शपथपत्र, एका भागीदाराने फर्मच्या वतीने करून देणे आवश्यक आहे.

iv. स्वयंघोषणा शपथपत्रात सहकारी संस्थांच्या अनुभवासंदर्भातील तपशील नमूद करणे आवश्यक आहे.

v. स्वयंघोषणा शपथपत्रात सनदी / परिव्यय लेखापालांच्या फर्मच्या बाबतीत तिचे भागीदार हे व्यक्तीगत किंवा इतर फर्ममध्ये भागीदार असणार नाहीत, त्याचप्रमाणे सदरहू माहिती सत्य असून त्यामध्ये काही खोटे आढळल्यास होणाऱ्या परिणामास व पुढील कारवाईस पात्र राहीन, याबाबतचा तपशील नमूद करणे आवश्यक आहे.

vi. सनदी/परिव्यय लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षक हे पूर्ण वेळ इतर आस्थापनेवर नोकरी नसलेबाबत स्वयंघोषीत शपथपत्रात नमूद करणे आवश्यक आहे तसेच स्वयंघोषीत शपथपत्रासोबत लेखापरीक्षण कामकाजासाठी प्रवास करणेची व लेखापरीक्षण कामकाज करणेची शारीरिक क्षमता असलेबाबत नोंदणीकृत वैद्यकीय चिकित्सकाने दिलेले **शारीरिक क्षमता प्रमाणपत्र** अपलोड केले बाबत स्वयंघोषीत शपथपत्रात नमूद करणे आवश्यक आहे.

## ९. सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा अनुभव :

i. सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाच्या अनुभवासंदर्भात केवळ नामतालिकेवर असलेल्या **सनदी / परिव्यय लेखापाल अथवा त्यांच्या फर्म्स** यांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र विचारात घेतले जाईल.

ii. सनदी / परिव्यय लेखापाल अथवा त्यांच्या फर्म राज्य शासनाच्या सहकार विभागाच्या नामतालिकेवर नसतील तर, त्यांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

iii. नामतालिकेवरील समावेशासाठी स्वत: सहकारी संस्थांचे अंतर्गत लेखापरीक्षण केले असल्यास तो अनुभव ग्राह्य धरावा, अथवा त्यासाठी सनदी / परिव्यय लेखापाल अथवा त्यांच्या फर्म यांनी दिलेले अंतर्गत लेखापरीक्षणासाठीचे अनुभव प्रमाणपत्र विचारात घ्यावे.

iv. ज्या सनदी / परिव्यय लेखापालांना सहकारी संस्थांच्या नियमित वैधानिक लेखापरीक्षणाचा अनुभव पाच वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा आहे, त्यांचा समावेश अ १

वर्गवारीमध्ये करावा. परंतु एखाद्या सनदी / परिव्यय लेखापालास **पाच वर्षांचा केवळ अंतर्गत लेखापरीक्षणाचा अनुभव** असेल तर, त्यांचा समावेश **ब १'** वर्गवारीमध्ये करावा.

v. ज्या प्रमाणित लेखापरीक्षकांना सहकारी संस्थांच्या नियमित वैधानिक लेखापरीक्षणाचा अनुभव दहा वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा आहे, त्यांचा समावेश **ब २'** वर्गवारीमध्ये करावा. परंतु एखाद्या प्रमाणित लेखापरीक्षकास **१० वर्षांचा केवळ अंतर्गत लेखापरीक्षणाचा अनुभव** असेल तर त्यांचा समावेश **क'** वर्गवारीमध्ये करावा.

vi. सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाच्या अनुभवासाठी सनदी / परिव्यय लेखापालांचे बाबतीत **सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टीस (COP) प्राप्त झाल्यानंतर** आणि प्रमाणित लेखापरीक्षकांच्या बाबतीत **जी. डी. सी. अॅण्ड ए. उत्तीर्ण झाल्यानंतर** त्यांना सहकारी संस्थांचे अंतर्गत लेखापरीक्षण, वैधानिक / वार्षिक, परिव्यय व मूल्य लेखापरीक्षणाचा **(Performance Audit)** अनुभव किती वर्षाचा आहे, यासाठी त्यांनी साध्या पेपरवर शपथपत्र लिहून ते स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.

**१०.** शासकीय लेखापरीक्षक वगळता इतर सर्व लेखापरीक्षकांनी ते एखाद्या संस्थेत अंतर्गत वा सतत व समवर्ती लेखापरीक्षण करीत असल्यास, ते त्या संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून काम स्विकारणार नाही, असे स्वयंघोषीत शपथपत्रात नमूद करणे आवश्यक आहे.

**११.** सर्व लेखापरीक्षकांच्या बाबतीत त्यांनी त्या संस्थेकडून रु. १०,०००/- पेक्षा अधिक कर्ज घेतलेले असल्यास, किंवा ते एखाद्या संस्थेचे संचालक, अधिकारी, कर्मचारी असल्यास अशा संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण स्विकारणार नाही, असे स्वयंघोषीत शपथपत्रात नमूद करणे आवश्यक आहे.

**१२.** सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाच्या अनुभवासंदर्भात लेखापरीक्षकांनी संबंधीत निबंधक / जिल्हा विशेष लेखापरीक्षक / संबंधीत संस्था यांचेकडे सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवालाची पोहोच किंवा तसे निबंधकाचे प्रमाणपत्र किंवा संस्थेस दाखल केलेल्या अंतर्गत लेखापरीक्षण अहवालाची पोहोच ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

**१३.** प्राप्त ऑनलाईन अर्जांची, निर्धारीत करून दिलेल्या कागदपत्रांसह संपूर्णपणे पूर्तता झालेली असून त्याप्रमाणे जिल्हास्तरीय समितीने छाननी परिपूर्णरित्या केलेली आहे, ही बाब जिल्हास्तरीय समितीच्या सर्व सदस्यांनी प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

## ५. तक्रार निवारण समितीने करावयाचे कामकाज :

नामतालिकेसाठी आलेल्या ऑनलाईन अर्जाच्या छाननीमध्ये अस्विकृत केलेल्या व्यथित अर्जदारांना दाद मागण्यासाठी व तद्नुषंगाने समन्वय करणेसाठी नियम ६९ (१) (फ) (पाच) प्रमाणे विभागीय सहनिबंधक यांचे अध्यक्षतेखाली विभागनिहाय तक्रार निवारण समित्या स्थापन कराव्यात. या समित्यांमध्ये विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) हे सदस्य आणि विभागीय उपनिबंधक हे सदस्य सचिव म्हणून काम करतील. सदर समितीचा निर्णय अंतिम असेल. सदर समित्यांनी पुढीलप्रमाणे कामकाज करणे अभिप्रेत आहे.

१. जिल्हा समितीने अस्विकृत केलेल्या अर्जांपैकी, ज्या बाधित अर्जदारांनी तक्रार निवारण समितीकडे दाद मागीतलेली आहे, अशा आलेल्या अर्जाची नोंद ठेवावी.

२. ई-मेलद्वारे अथवा अन्य प्रकारे कळविलेल्या अस्विकृतीच्या कारणांच्या अनुषंगाने अर्जदाराने तक्रार अर्जासमवेत सादर केलेल्या कागदपत्रांवरून, वर नमूद केलेल्या निकषांनुसार पडताळणी करून अर्ज अंतिम करावा.

३. प्राप्त तक्रार अर्जाबाबत ठेवलेल्या नोंदवहीत नोंदलेल्या तपशीलानुसार संबंधीतांचा ऑनलाईन अर्ज स्विकारावा किंवा नाकारावा याबाबतच्या शिफारशीच्या नोंदी कराव्यात.

४. तक्रार अर्जाप्रमाणे कागदपत्रांच्या छाननीनंतर नामतालिकेवरील समावेशासाठी पात्र अथवा अपात्र ठरवलेल्या शिफारसीनुसार अर्जदारांची यादी संबधित कागदपत्रासह समिती सदस्यांनी सही करून सहकार आयुक्त कार्यालयाकडे हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी स्वरुपात दैनंदिनरित्या **comm.audit.18 @gmail.com** सादर करावी.

**६. लेखापरीक्षकांचा प्रकार, लेखापरीक्षणाचा अनुभव व अर्हता या बाबी विचारात घेवून, लेखापरीक्षकांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करावे.**

| लेखापरीक्षक वर्ग | लेखापरीक्षक उप वर्ग | लेखापरीक्षकांचा प्रकार | संस्थेच्या कामकाजाचे उचित ज्ञान असणे व मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. या व्यतिरिक्त आवश्यक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|
| अ | **अ १** | सनदी / परिव्यय लेखापाल भागीदारी फर्म | २ किंवा २ पेक्षा जास्त लेखापालांची भागीदारी फर्म - लेखापरीक्षण अनुभवाची आवश्यकता नाही. |
| | **अ १** | सनदी / परिव्यय लेखापाल | सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणचा किमान ५ किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांचा अनुभव असणारे सनदी / परिव्यय लेखापाल व त्यांच्या प्रोप्रायटरी फर्म. |
| | **अ १** | अपर निबंधक | शासनाचे सहकार खात्यातील अपर निबंधक (लेखापरीक्षण) |
| | **अ १** | सहनिबंधक | शासनाचे सहकार खात्यातील सहनिबंधक (लेखापरीक्षण) |
| | **अ २** | विशेष लेखापरीक्षक वर्ग १ | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील विशेष लेखापरीक्षक, वर्ग १ |
| ब | **ब १** | सनदी / परिव्यय लेखापाल | सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणचा किमान १ वर्षाचा परंतु ५ वर्षापेक्षा कमी अनुभव असणारे सनदी / परिव्यय लेखापाल व त्यांच्या प्रोप्रायटरी फर्म. केवळ ५ वर्षाचा अंतर्गत लेखापरीक्षण अनुभव असणारे सनदी / परिव्यय लेखापाल. |
| | **ब १** | विशेष लेखापरीक्षक, वर्ग २ | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील विशेष लेखापरीक्षक, वर्ग २ |
| | **ब २** | लेखापरीक्षक, श्रेणी १ | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील लेखापरीक्षक, श्रेणी १ |
| | **ब २** | प्रमाणित लेखापरीक्षक | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केलेले व सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका संपादन केलेले आणि सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्याचा किमान १० अथवा त्यापेक्षा जास्त वर्षाचा अनुभव असणारे प्रमाणित लेखापरीक्षक. |
| क | **क** | प्रमाणित लेखापरीक्षक | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केलेले व सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका संपादन केलेले आणि सहकारी संस्थाचे लेखापरीक्षण करण्याचा किमान ३ वर्षाचा परंतु १० वर्षापेक्षा कमी अनुभव असणारे प्रमाणित लेखापरीक्षक. केवळ १० वर्षाचा अंतर्गत लेखापरीक्षणाचा अनुभव असणारे प्रमाणित लेखापरीक्षक. |

| लेखापरीक्षक वर्ग | लेखापरीक्षक उप वर्ग | लेखापरीक्षकांचा प्रकार | संस्थेच्या कामकाजाचे उचित ज्ञान असणे व मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. या व्यतिरिक्त आवश्यक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|
| | क | लेखापरीक्षक श्रेणी २ आणि उपलेखापरीक्षक | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील लेखापरीक्षक, श्रेणी २ आणि उपलेखापरीक्षक |

७. वरीलप्रमाणे कार्यवाही वेळेची मर्यादा पाळून पूर्ण करणे आवश्यक आहे.

८. संपूर्ण राज्यासाठी व सर्व प्रकारच्या संस्थांसाठी लेखापरीक्षकांची संयुक्त अशी नामतालिका सहकार आयुक्त कार्यालयाद्वारे तयार करण्यात येईल.

९. (१) परिशिष्ट क्र. १ - लेखापरीक्षक नामतालिकेसंदर्भातील लेखापरीक्षकांचा प्रवर्ग व त्यानुसार वर्गीकरण, (२) परिशिष्ट क्र. २ - लेखापरीक्षक नामतालिकेवर येण्यासाठी मराठी भाषा, शैक्षणिक अर्हता व अनुभव या संदर्भातील साध्या कागदावरील शपथपत्र, (३) परिशिष्ट क्र. ३ - नामतालिकेवरील समावेशासाठी करावयाच्या अर्जासंदर्भातील सूचना सोबत जोडल्या आहेत. त्यामधील सुचना, निर्देश व विहीत केलेले नमुने अर्ज दाखल व छाननी करताना सर्वांनी विचारात घ्यावेत.

वरील प्रमाणे विस्तृतपणे दिलेल्या सर्व सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून सर्व संबंधीत कार्यालयांनी लेखापरीक्षा नामतालिकेबाबत अचूकता साधली जाईल, याची दक्षता घ्यावी.

**सोबत -परिशिष्ट क्र. १ ते ३**

**( दिपक तावरे भा.प्र.से. )**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत माहितीस्तव :**

१) मा. प्रधान सचिव (सहकार व पणन ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) आयुक्त, ( वस्त्रोद्योग ), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर
४) संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,पुणे
५) अपर आयुक्त व विशेष निबंधक, महाराष्ट्र राज्य ,पुणे
६) अपर निबंधक, सहकारी संस्था (वसुली व नियोजन / तपासणी व निवडणूक / प्रशासन)
७) विशेष कार्य अधिकारी तथा अतिरिक्त निबंधक, पदुम लेखापरीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव.

**प्रत :- पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी व सुचना फलकावर प्रसिद्धीसाठी :**

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सर्व विभाग.
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) सर्व विभाग.
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व.
४) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१ , सहकारी संस्था, सर्व.

# परिशिष्ट क्र. १

## लेखापरीक्षक नामतालिकेसंदर्भातील लेखापरीक्षकांचा प्रवर्ग व त्यानुसार वर्गीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ (१) (फ) (सात) नुसार लेखापरीक्षकांचा प्रवर्ग व त्यांचा अनुभव विचारात घेवून सहकारी संस्था व लेखापरीक्षकांची 'अ', 'ब', 'क' अशी वर्गवारी पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

| लेखापरीक्षक वर्ग | लेखापरीक्षक उपवर्ग | लेखापरीक्षकांचा प्रकार | संस्थेच्या कामकाजाचे उचित ज्ञान असणे व मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. या व्यतिरिक्त आवश्यक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|
| अ | अ १ | सनदी / परिव्यय लेखापाल भागीदारी फर्म | २ किंवा २ पेक्षा जास्त लेखापालांची भागीदारी फर्म - लेखापरीक्षण अनुभवाची आवश्यकता नाही. |
| | अ १ | सनदी / परिव्यय लेखापाल | सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणचा किमान ५ किंवा त्यापेक्षा जास्त वर्षाचा अनुभव असणारे सनदी / परिव्यय लेखापाल व त्यांच्या प्रोप्रायटरी फर्म. |
| | अ १ | अपर निबंधक | शासनाचे सहकार खात्यातील अपर निबंधक (लेखापरीक्षण) |
| | अ १ | सहनिबंधक | शासनाचे सहकार खात्यातील सहनिबंधक (लेखापरीक्षण) |
| | अ २ | विशेष लेखापरीक्षक वर्ग १ | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील विशेष लेखापरीक्षक वर्ग १ |
| ब | ब १ | सनदी / परिव्यय लेखापाल | सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणचा किमान १ वर्षाचा परंतु ५ वर्षापेक्षा कमी अनुभव असणारे सनदी / परिव्यय लेखापाल व त्यांच्या प्रोप्रायटरी फर्म. केवळ ५ वर्षाचा अंतर्गत लेखापरीक्षण अनुभव असणारे सनदी / परिव्यय लेखापाल. |
| | ब १ | विशेष लेखापरीक्षक, वर्ग २ | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील विशेष लेखापरीक्षक, वर्ग २ |
| | ब २ | लेखापरीक्षक, श्रेणी १ | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील लेखापरीक्षक श्रेणी १ |
| | ब २ | प्रमाणित लेखापरीक्षक | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केलेले व सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका संपादन केलेले आणि सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करण्याचा किमान १० अथवा त्यापेक्षा जास्त वर्षाचा अनुभव असणारे प्रमाणित लेखापरीक्षक. |
| क | क | प्रमाणित लेखापरीक्षक | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केलेले व सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका संपादन केलेले आणि सहकारी संस्थाचे लेखापरीक्षण करण्याचा किमान ३ वर्षाचा परंतु १० वर्षापेक्षा कमी अनुभव असणारे प्रमाणित लेखापरीक्षक. केवळ १० वर्षाचा अंतर्गत लेखापरीक्षणाचा अनुभव असणारे प्रमाणित लेखापरीक्षक. |
| | क | लेखापरीक्षक श्रेणी २ आणि उपलेखापरीक्षक | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील लेखापरीक्षक, श्रेणी २ आणि उपलेखापरीक्षक |

# परिशिष्ट क्र. २

**लेखापरीक्षक नामतालिकेवर येण्यासाठी मराठी भाषा, शैक्षणिक अर्हता व अनुभव या संदर्भातील साध्या कागदावरील स्वयंघोषीत शपथपत्र.**

**सनदी / परिव्यय लेखापाल / फर्मचा भागीदार / प्रमाणित लेखापरीक्षक**

मी, श्री. ---------------------------------------------------------------- सनदी / परिव्यय लेखापाल / प्रमाणित लेखापरीक्षक , वय ---------- , राहणार ---------------------------------------------------, प्रतिज्ञेवर लिहून देतो की, मी --------------------------------------------------------------------- या परीक्षा ------------- या दिनांकास उत्तीर्ण असून आतापर्यंत मला ----------- वर्षांचा सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा अनुभव असून मी आतापर्यंत खालील संस्थांचे लेखापरीक्षण केले आहे व त्याचे अहवाल सहकार खात्याकडे / संस्थेकडे सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | वर्ष | संस्थेचे नाव | लेखापरीक्षणाचा प्रकार (वार्षिक, चाचणी, फेरलेखापरीक्षण, परिव्यय व मुल्य (Performance) लेखापरीक्षण) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

- **टीप** : अनुभवाच्या प्रत्येक वर्षासाठी किमान १ व कमाल ३ संस्थांची नावे द्यावीत व लेखापरीक्षणाचा प्रकार नमूद करावा.

१. माझे / आमचे महाराष्ट्रात किमान ३ वर्ष वास्तव्य असून मला मराठीचे ज्ञान आहे.

२. मी ज्या संस्थेकडून रु. १० हजारापेक्षा जास्त रक्कमेचे कर्ज घेतलेले नाही, अशाच संस्थांचे लेखापरीक्षण करण्यास स्विकृती देईन.

३. मी ज्या संस्थेचा अधिकारी, कर्मचारी अथवा संचालक असेल, त्या संस्थेचे लेखापरीक्षण करणार नाही.

४. मी ज्या संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षण केलेले आहे, त्या संस्थेचे, त्या वर्षाचे वैधानिक वार्षिक लेखापरीक्षण करण्यास स्विकृती देणार नाही.

५. सनदी / परिव्यय लेखापालांच्या फर्मच्या बाबतीत तिचे भागीदार हे व्यक्तीगत किंवा इतर फर्ममध्ये भागीदार नाहीत. तसेच आमचे फर्मचे ICAI / ICWA कडील नोंदणी प्रमाणपत्रानुसार नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्रात आहे.

६. सनदी / परिव्यय लेखापालांच्या फर्मच्या भागीदारांनी नामतालिकेसाठी स्वतंत्रपणाने किंवा इतर भागीदारी फर्मसच्या माध्यमातून नामतालिकेवरील समावेशासाठी अर्ज केलेला नाही.

७. मी कोणत्याही आस्थापनेवर पूर्ण वेळ नोकरीत नाही.

८. अर्ज करतेवेळी ६५पेक्षा अधिक वय असलेल्या सनदी/परिव्यय लेखापाल / प्रमाणित लेखापरीक्षक यांचे बाबतीत लेखापरीक्षण कामकाजासाठी प्रवास करणेची व लेखापरीक्षण कामकाज करणेची शारीरिक क्षमता असलेबाबत नोंदणीकृत वैद्यकीय चिकित्सकाने दिलेले शारीरिक क्षमता प्रमाणपत्र या **स्वयंघोषीत** शपथपत्रासोबत पी. डी. एफ.स्वरुपात अपलोड केलेले आहे.

सदरहू माहिती सत्य असून त्यामध्ये काही खोटे आढळल्यास, होणाऱ्या परिणामास व कारवाईस मी पात्र राहीन.

**स्थळ :-**
**दिनांक :- / /२०२६**

**सही /-**
(अर्जदाराचे नाव)

## परिशिष्ट क्र. ३

### नामतालिकेवरील समावेशासाठी करावयाच्या अर्जासंदर्भातील सूचना :

- **ऑनलाईन अर्ज सादर करावयाचा कालावधी :**
  सहकारी संस्थाच्या लेखापरीक्षणांसाठी **सन २०२६-२०२८ या कालावधीसाठी तयार करावयाच्या** नवीन लेखापरीक्षक नामतालिकेवर येण्यासाठी इच्छुक असणाऱ्या पात्र लेखापरीक्षकांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठी https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या पोर्टलवर दिनांक **०६/४/२०२६ ते २०/४/२०२६** या कालावधीसाठी खुली (ओपन) करण्यात येत आहे. नवीन अर्जदार यांनी प्रोफाईल तयार करण्यापूर्वी तसेच अगोदरच्या नामतालिकेसाठी माहिती भरलेल्या लेखापरीक्षकांनी लॉग-इन करण्यापूर्वी लेखापरीक्षक लॉगीन विंडोमध्ये लेखापरीक्षक प्रकारनिहाय दिलेल्या सूचना वाचणे आवश्यक आहे. उमेदवारांनी संकेतस्थळावर अर्ज दाखल करणेसाठी खालील पद्धतीचा वापर करावा.
  - Basic Workflow to Access the Audit Module (Online Audit Management System)
  - 1) Open the Maharashtra Sahakar Portal
  - Go to the official portal:

    https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/
  - 2) Navigate to the Audit Module
  - On the main menu:
  - → **More Menu**

    → **eGovernance and IT systems**

    → **Online Audit Management System**
  - This will take you to the audit system landing page.
  - 3) Open the Login Page
  - Click on:
  - → **Auditor / Society Login**
  - This opens the audit login interface at:

    https://docmtapps.mahaonline.gov.in/Account/Login/Login.aspx

- **नामतालिकेवरील समावेशासाठी अर्ज करू शकणारे लेखापरीक्षक :**

  **I. सद्यस्थितीत नामतालिकेवर असलेले लेखापरीक्षक :**

  १. नवीन नामतालिकेवरील समावेशासाठी सद्यस्थितीत नामतालिकेवर असलेल्या लेखापरीक्षकांनी त्यांचे सध्याचे युजर आयडी (User ID) व पासवर्ड (Password) चा वापर करून लॉग-इन व्हावे.

  २. तद्नंतर त्यांना त्यांचे प्रोफाईल दिसेल. प्रोफाईल मधील माहितीपैकी **(लेखापरीक्षक प्रकार व नामतालिका क्रमांक वगळता)** उर्वरीत माहितीपैकी ज्यामध्ये दुरूस्ती / बदल करावयाचा आहे, त्यामध्ये दुरूस्ती / बदल करावा व त्याअनुषंगाने कागदपत्रे अपलोड करून माहिती **'सेव्ह' करून 'सबमीट'** करावी.

  ३. जर प्रोफाईल मधील माहितीमध्ये बदल करावयाचा नसल्यास, केवळ **'सेव्ह' करून 'सबमीट'** करावे.

  ४. नवीन नामतालिकेवरील समावेशासाठी **सद्यस्थितीत नामतालिकेवर असलेल्या लेखापरीक्षकांनी** त्यांचे पूर्वीचे अथवा बदल केलेल्या तपशीलासह प्रोफाईल **माहिती 'सेव्ह' व 'सबमीट'** करणे आवश्यक आहे.

  **५. सध्या नामतालिकेत असलेल्या लेखापरीक्षकांना "ऑडीटर टाईप" बदलायचा असल्यास, त्यांनी New User तयार करून नव्याने नोंदणीकृत होणे आवश्यक आहे.**

**II. नामतालिकेवर नव्याने येवू इच्छिणारे लेखापरीक्षक :**

१. जे लेखापरीक्षक नव्याने नामतालिकेवर येवू इच्छितात त्यांनी New User वर click करून येणाऱ्या फॉर्ममध्ये योग्य तो लेखापरीक्षक प्रकार निवडून, त्यांचे नवीन युजर आयडी (User ID) व पासवर्ड (Password) तयार करून लॉग-इन व्हावे.

२. लॉग-इन झाल्यावर प्रोफाईल मधील तपशीलाप्रमाणे आवश्यक ती माहिती भरून त्याअनुषंगिक कागदपत्रे अपलोड करून माहिती 'सेव्ह' व 'सबमीट' करावी.

- **अर्जासोबत अपलोड करावयाची कागदपत्रे :**

१. **लेखापरीक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे.** उदा.

- सनदी / परिव्यय लेखापालांच्या भागीदारी फर्म्स - Constitution Certificate./ Firm Registration Card
- सनदी / परिव्यय लेखापालांच्या भागीदारी फर्म्सचे सर्व भागीदार - Chartered Accountant/Cost Accountant ची पदवी व Certificate of Practice
- वैयक्तिक सनदी / परिव्यय लेखापाल - Chartered Accountant/Cost Accountant ची पदवी, Certificate of Practice व Constitution Certificate.,
- प्रमाणित लेखापरीक्षक - पदवी प्रमाणपत्र, जी.डी.सी.अँण्ड ए. परीक्षा पास झाले संदर्भातील प्रमाणपत्र.

२. **सहकारी संस्था लेखापरीक्षण अनुभवासंदर्भातील कागदपत्रे :**

- सनदी / परिव्यय लेखापालांच्या भागीदारी फर्म्स - अनुभवाची आवश्यकता नाही.
- सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण अनुभवाबाबत त्या-त्या वेळी नामतालिकेवर असलेल्या सनदी/परिव्यय लेखापालांच्या भागीदारी फर्म्स अथवा सनदी / परिव्यय लेखापाल यांनी दिलेली प्रमाणपत्रेच ग्राह्य धरणेत येतील.
- सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाच्या अनुभवासाठी प्रत्येक वर्षातील किमान १ व कमाल ३ संस्थांचे लेखापरीक्षणाबाबत संबंधीत नोंदणी अधिकारी / निबंधक / जिल्हा विशेष लेखापरीक्षक अथवा संस्था यांचेकडे लेखापरीक्षण अहवाल सादर केल्याची पोहच किंवा त्याअनुषंगाने संबंधीत निबंधकांचे प्रमाणपत्र **PDF फॉरमॅटमध्ये (१ एमबी)** अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

**३. लेखापरीक्षकांचा पासपोर्ट साईज (५०-१०० KB) फोटो.**

**४. कागदपत्रे अपलोड करताना ती PDF फॉरमॅटमध्ये व फोटो JPEG/PNG फॉरमॅटमध्ये असणे आवश्यक आहे.**

**५. लेखापरीक्षकांच्या पॅन कार्डची स्कॅन प्रत.**

फर्ममधील भागीदार/सदस्य तसेच प्रत्येक वैयक्तिक लेखापरीक्षक यांनी त्यांचा पॅन नंबर नमूद करणे व त्याची स्कॅन कॉपी **PDF फॉरमॅटमध्ये (१ एमबी)** अपलोड करणे अनिवार्य राहील.

६. **स्वयंघोषीत शपथपत्र.** परिशिष्ट क्र. २ मधील नमुन्याप्रमाणे.

७. ६५ पेक्षा अधिक वयाचे सनदी लेखापाल / परीव्यय लेखापाल / प्रमाणित लेखापरीक्षक यांचे बाबतीत लेखापरीक्षण कामकाजासाठी प्रवास करणेची व लेखापरीक्षण कामकाज करणेची शारीरिक क्षमता असलेबाबत नोंदणीकृत वैद्यकीय चिकित्सक यांचे कडील शारीरिक पात्रता प्रमाणपत्र.

- **अर्जदारांनी लेखापरीक्षक प्रोफाईल मधील माहिती काळजीपूर्वक व अचूकपणे भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जासंदर्भातील परिपत्रकीय सुचनांप्रमाणे आवश्यक ती सर्व प्रकारची अनुषंगिक कागदपत्रे पुराव्यादाखल योग्यरित्या दिसतील, अशा प्रकारे ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
५- बी. जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.०२०-२६१२२८४६/४७ Email Id - comm.audit.18@gmail.com

---

**: लेखापरीक्षक नामिकेसंदर्भातील सुचना :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(१)(ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९(१)(फ) मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थाच्या लेखापरीक्षणांसाठी सन २०२६-२०२८ या कालावधीची राज्यस्तरीय लेखापरीक्षकांची नामतालिका तयार करण्यासाठी https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या पोर्टलवर दिनांक **०६/०४/२०२६ ते २०/४/२०२६** या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन अर्जासंदर्भातील परिपत्रकीय सूचना सहकार विभाग / सहकार आयुक्त व निबंधक यांचे संकेतस्थळावर आणि सर्व जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक, विभागीय सहनिबंधक यांचे कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे.

**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**